**सं.फौ.ख.क्र.४६/२०२४**
**सरकार वि. प्रकाश**
**नि.क्र.११ च्या खाली**

साक्षीदार क्र **०१** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–ऋषिकेश चंद्रभान कांबळे
वय २५ वर्ष, व्यवसाय– पानठेला
राह.बेला, ता.उमरेड,जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत</u>**

१. पोलिसांनी मला पंचनामा करण्याकामी समन्सपत्र दिले होते. आता मला समन्स पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **निशाणी क्र.१३** देण्यात आला. मी घटनास्थळावर गेलो त्यावेळी पोलिसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार करण्यात आला. त्यावेळी आरोपी दारू पिलेला होता. आता मला पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यास **निशानि क्र.१४** देण्यात आले. आता मला दोन फोटो दाखविण्यात आले त्यामध्ये माझा फोटो आहे. त्याला **आर्टीकल अ व ब अनुक्रमे** देण्यात आले. पोलिसांनी माझे बयाण घेतले होते.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे ॲड.श्रीमती एस.जी.रामटेके यांच्यामार्फत उलटतपास सुरू.</u>**

२. मी माझ्या जन्मापासून बेला येथे राहतो. माझे शिक्षण १५ वी पर्यंत झालेले आहे. घटनास्थळ पंचनाम्याची निश्चित वेळ व तारिख काय होती ते मला सांगता येत नाही. घटनास्थळाची चतु:र्सिमा मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा आधीच लिहीलेला होता आणि मी फक्त त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळावर प्रत्यक्ष हजर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा दारू पिउन आरडाओरड करत होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांसोबत माझे चांगले संबंध असल्यामुळे त्यांच्या सांगण्यावरून आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे घटनास्थळ पंचनामा तयार करण्यात आला नाही व आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**
**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा.

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.२३.०६.२०२५

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड